# प्रकरण पहिले

## संशोधन पध्दती

१.१ समस्येची मांडणी आणि नमुना निवड

१.२ गहितके

१.३ अभ्यासाची उद्दिष्टे

१.४ संशोधनाचा आराखडा

१.५ अंक संकलन

## प्रकरण पहिले

## संशोधन पध्दती

### १.१ समस्येची मांडणी आणि नमुना निवड :

शेतमालाचे उत्पादन हे हंगामी स्वरूपाचे असते. परंतु त्याला असणारी मागणी संपूर्ण वर्षभर असते. त्यासाठी शेतमालाचा पुरवठा वर्षभर होणे गरजेचे असते. त्याच बरोबर शेतमालाला योग्य किंमत मिळणे गरजेचे असते. त्यासाठी अनेक प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी देशातील बाजार यंत्रणा चांगली असणे आवश्यक आहे. इतर बाजार व्यवस्थेपेक्षा वायदेबाजाराची यंत्रणा ही पूर्णत: वेगळी आहे. वायदे व्यापारामुळे योग्य किंमत मिळण्याच्या सोयी उपलब्ध होतात. त्याच बरोबर शेतमालाच्या किंमतीत होणारी वेगाची चढ-उतार कमी होण्यास मदत होते. व्यापार आणि प्रक्रिया करणारे उद्योजक सर्वसाधारणपणे वायदे व्यापार आणि हजर स्टॉक यामध्ये समन्वय घालण्याचा प्रयत्न करतात. वायदे व्यापाराची कल्पना वरील सर्व घटनांतूनच उदयास आलेली आहे.

वायदे व्यापारात हळदीची कोणत्याही प्रकारची पाठवणी न करता ती पेवातच राहते. परंतु वायदे बाजारात कितीतरी वेळा खरेदी-विक्रीचे व्यवहार होत असतात. वायदे बाजारात सांगली येथे फक्त हळदीचे वायदे व्यापार होतात. सांगली हे भारतातील वायदे व्यापाराचे एकमेव केंद्र असून ते १९०५ पासून कार्यरत आहे. आणि वायदे बाजाराचे एक्स्चेंज दि स्पायसेस अँन्ड आईल सिडस् एक्स्चेंज लि., सांगली या नावाने कार्य करीत आहे. अभ्यास करीत असताना भारतातील महाराष्ट्र राज्यातील सांगली येथेच हळदीचा वायदे बाजार का स्थापन झाला व किंमत पातळीच्या बाबतीत हा किंमत स्थैर्य राखू शकतो हा महत्वाचा भाग आहे. आणि महत्वाचे म्हणजे सांगली जिल्हा तुलनात्मक दृष्टया हळदीचे कमी उत्पादन करणारा जिल्हा असूनही येथे वायदे बाजाराचे आयोजन झाले आहे.

संशोधनाच्या अभ्यासासाठी सांगली येथील हळद वायदे बाजाराची निवड केली आहे.

१.२ <u>गृहितके</u> :

१) दक्षिण भारतातील सांगली हळदीची प्रमुख बाजारपेठ आहे की जिथे हळदीच्या वायदे व्यापाराचे आयोजन व नियंत्रण केले जाते. जवळ-जवळ आज आठ दशके म्हणजे ८५ वर्षे हळदीचा वायदेबाजार अव्याहतपणे कार्य करीत आहे.

२) महाराष्ट्रात ऊस शेती सुरू झाल्यापासून हळदीच्या उत्पादनाचे जमिनीचे क्षेत्र कमी होऊ लागले आहे आणि त्याचबरोबर दर हेक्टरी उत्पादकता तुलनात्मकदृष्ट्या कमी होऊ लागली आहे. असे असतानाही हळदीचा वायदे बाजार सांगलीत आहे.

३) हळदीचा व्यापर व वायदे बाजार संपूर्ण भारतात फक्त सांगली शहरातच केला जातो.

४) सांगली या शहरातच वायदे व्यापाराचा विकास होण्यास महत्त्वाची अनेक कारणे कारणीभूत ठरली त्यामध्ये वायदे व्यापारासाठी असणाऱ्या सुखसोयी व सुविधा याच कारणीभूत आहेत.

५) व्यापाऱ्यांना असणारा पुर्वानुभव, नैसर्गिक पेवांची सोयी, बँकिंग सुविधा व दळणवळणाचा सोयी याशिवाय कोणत्याही ठिकाणी वायदे बाजाराचा उदय किंवा विकास होत नाही.

१.३ <u>अभ्यासाची उद्दिष्टे</u> :

१) हळद वायदे बाजाराची ओळख करून घेणे, तेथील कार्य व पध्दतींचे अवलोकन व समीक्षण करणे, इ.

२) सांगली येथील दि स्पायसेस ॲन्ड ऑईल सिड्स एक्स्चेंज लि., यांचा ऐतिहासिक व सद्य:स्थितीचा अभ्यास करणे.

३) हळदीच्या वायदे व्यापारात दि स्पायसेस ॲन्ड ऑईल सिड्स एक्स्चेंजचा सहभागाचे मूल्यमापन करणे.

४) वायदे बाजाराचा किंमतीतील चढ-उताराचा किंवा जादाची वधवट रोखण्यात येश मिळवू शकते का ? याचा अभ्यास करणे.

## १.४ संशोधनाचा आराखडा :

या संशोधन अहवालामध्ये दि स्पायसेस ॲन्ड ऑईल सिड्स एक्स्चेंज लि., सांगली यांचे महत्व, कार्य व प्रश्न याबाबत अभ्यास केलेला आहे. प्रारंभी भारतातील वायदे बाजार व त्यांचा इतिहास यांचा अभ्यास करून सांगली येथील हळद वायदे बाजाराची स्थापना, व्यवस्थापन, संघटन, कार्य-पध्दती, व्यवहार इ. घटकांचा मुद्देसूद अभ्यास केलेला आहे. हा अभ्यास करीत असताना दुय्यम साधनसामुग्रीचा वापर केलेला आहे व त्याचे पृथ्थकरण केलेली आहे. या अभ्यासात खुल्या पध्दतीने चर्चा करून व निरीक्षण करून या वायदे बाजार यंत्रणेच्या कार्यपध्दतीचा अभ्यास केलेला आहे.

## १.५ अंक संकलन :

या प्रबंधातील संपूर्ण अभ्यास दुय्यम साधनसामुग्रीवरती अवलंबून आहे की जो प्रामुख्याने अनेक पध्दतीने गोळा केलेला आहे. १९७९ ते १९८९ या कालातील वायदे बाजाराचा तपशील अभ्यासलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने वायदे बाजार आयोगाचे अहवाल दि स्पायसेस ॲन्ड ऑईल सिड्स एक्स्चेंजचे वार्षिक अहवाल यांचा प्रामुख्याने अधिक उपयोग केलेला आहे. त्याच बरोबर चेम्बर ऑफ कॉमर्सचे पेवाविषयी असलेल्या नोटस् दैनंदिन वर्तमानपत्रातून येणारी अभ्यासविषयक माहिती यांचा वापर केलेला आहे. त्याच बरोबर कार्यालयीन दप्तरांच्या आधारे आणि महत्वाचे म्हणजे अनेक

व्यापाऱ्यांशी त्याच बरोबर कार्यालयीन सेक्रेटरी व इतर लोकांच्या बरोबर चर्चा करण्यात आली. कार्यपध्दतीचे वारंवार निरिक्षण करण्यात आले. तसेच या विषयासंबंधित माहिती प्रामुख्याने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या ग्रंथालयातील पुस्तके, नियतकालिके यातून मिळवली आहे.

या प्रबंधात सारणीकरण, टक्केवारी, यासारख्या साध्या सोप्या शास्त्रीय तंत्राचा वापर केलेला आहे.

दुसऱ्या प्रकरणात शेतमालाच्या विक्री व्यवस्थेचे मूल्यमापन करून, शेतमालाच्या वायदे बाजारासंबंधी माहिती दिली आहे.

तिसऱ्या प्रकरणात हळदीचा उपयोग, हळद क्षेत्र, आणि उत्पादन, निर्यात इ. संबंधीचे विवेचन केले आहे.

चौथ्या प्रकरणात हळद बाजाराचा तपशील आहे. विशेषतः हळद वायद्याचा इतिहास, साठवणूक (पेवे), वायदे व्यवहाराचे व्यवस्थापन, हळदीचे दर, आवक-जावक इ. चा तपशील पाहिलेला आहे.

प्रकरण पाचव्यामध्ये निष्कर्ष आणि समारोप मांडलेला आहे.